# चिनी भस्मासुर !

## पोवाडा —————— : ३३ :

### चौक १ ला

मायभूमिची इज्जत घ्याया चिनी भस्मासुर हा आला । उठा उठा तुम्ही झुंजारांनो, पळवुनि लावा दुष्टाला ॥ भोळा शंकर प्रसन्न झाला पंचशिलाचा वर दिला । वरलाभानं मत्त होउनी हत्यार घेऊन हा आला ॥ दुष्ट दुरात्मा कपटि रानटी क्रूर लांडगा हा आला । सह्याद्रीच्या नरसिंहांनो, झडप घालुनी ठार करा ॥ हिमालयाच्या खिंडिखिंडितुन राक्षस हा चालुन आला । हर हर हर हर महादेव हा आवाज भिडुं दे गगनाला ॥ संकट मोठें राष्ट्रावरती मनीं धरा या बोलाला । एक दिलानं झुंज देउनी हाकलुन लावा शत्रूला ॥ १ ॥

● ●

### चौक २ रा

कोल्हा, लांडगा, वाघ, सापावर विश्वास कधिंहि ठेवुं नका । तसाच विंचू ठेचुन काढा, विचार मुळिं तुम्हि करूं नका ॥ देशद्रोही देशघातकी सामील जे जे शत्रूला, अद्दल घडवा कायमची तुम्ही त्यांना ऐका या बोलाला ॥ चाल ॥ पाठींत मारला खंजीर । शत्रुनं केला हा वार ॥ जी ॥ २ ॥

● ●

### चौक ३ रा

पूर्वज तुमचे महापराक्रमी शूर वीरांनो विसरूं नका । कोट करा छातिचा बंधुंनो, वेळ अकारण दवडुं नका ॥ शहाजीराजे महाधुरंधर

धाक लावला शत्रूला। छत्रपति श्रीशिवाजीराजे पुत्र शोभती वीराला॥ फिरंगी फिरवी शिवबा इकडे तिकडे मोगल गडबडला। नांव ऐकुनी श्रीशिवबांचे दुस्मान कासाविस झाला॥ शिवतेजाची वीज देतसे झटके मोगल राजाला। कांहीं सुचेना अन्न रुचेना झोंपहि येना डोळ्याला॥ भगवा झेंडा फडफड फडके भूषण वाऱ्याला झाला। फडफड करुनी गगनीं बोले 'धन्य शिवाजी अवतरला'॥ दऱ्याखोऱ्यांतून, मैदानांतून पाउल टाकी शिव जेव्हां। विजयश्रीचीं फुलें उमललीं त्या त्या स्थानीं मग तेव्हां॥ जी॥ शिवाजीनं आणलं स्वातंत्र्य महाराष्ट्राला॥ किति काळ भयंकर आला होता त्या वेळा॥ पण शिवाजी झाला सामोरा। मावळ्यांचं सैन्य खडं केलं झुंज देण्याला॥ चाल॥ प्राणांची कुरवंडी केली महाराष्ट्रानं॥ रक्ताचे सडे घातले महाराष्ट्रानं॥ तलवारी, भाले, परजले महाराष्ट्रानं॥ मायेचे पाश तोडले महाराष्ट्रानं॥ मृत्यूला मिठ्या मारल्या महाराष्ट्रानं॥ शत्रूंचा बीमोड केला महाराष्ट्रानं। प्रतापगडला शिवाजीनं केलं शत्रूला ठार॥ पन्हाळगडचा वेढा लढविती मोठे झुंजार। बाजी-प्रभु पावनखिंडींत पडले रणवीर॥ चाल॥ शाहिस्त्याला धडा शिकविला। शिवराया गेला आग्ऱ्याला। तिथं कैद केलं राजाला। पण राजा पेटाऱ्यातनं पार सुटूनहि आला॥ सिंहगड घेतांना ताना पडला धरणीला॥ ही परंपरा शूरांची आणा चित्ताला॥ ३॥

● ●

## चौक ४ था

दिल्लीपतीला मदत केली पेशवाईच्या काळांत। एकछत्री मग भारत झाला वीर मराठे दिल्लींत। पानपतावर युद्ध पेटलें लाखों मराठे रणिं पडले। नसानसांतुन रक्त उसळलें शत्रूवर चालून गेले॥ चाल॥ जनकोजी शिंदे सुकुमार। विश्वासराव ते वीर। भाऊसाहेब लढतां लढतांना गेले स्वर्गाला॥ अशा कैक वीरांनीं देह रणीं ठेविला॥ प्राणांचा बळी कैकांनीं देविला दिला। पण मराठ्यांच्या कीर्तिचा झेंडा सारखा फडकला। १८५७ साल। पेटलें पहा चौफेर॥ झांशीच्या राणीनं आत्मयज्ञ तो केला॥ वासुदेव बळवंत मोठा झुंजार झाला॥ लोकमान्य टिळकांनीं झगडा मोठा सुरू केला॥ महात्मा गांधींनीं झगडा नेला शेवटाला॥ १९४७ ला हा भारत स्वतंत्र झाला॥ धड पंधरावर्सं झालीं नाहींत त्याला॥ तर पुन्हां आला परक्यांचा हल्ला। दुनियेंत शांतता मंत्र घोष ज्यानं केला॥ त्याच्याच पाठींत खंजीर खुपसला। घ्या सूड त्याचा या वेळा। एकजूट करून शत्रूचा नायनाट करा। पुन्हां मिळवा हिमालय सारा। मग कैलासपतीची पूजा कराया चला। आजपावेतों हिमालयानं उत्तर सीमा राखियली। पण बेसावधपण धरुनि राहिलों आम्हीं भारतीय आजवरी॥ कावा साधला दुस्मानानं गाफिलपण हें पाहुनिया। सावध व्हा रे सावध व्हा रे रात्र वैऱ्याची समजुनिया॥ भारतीयांनो, एक होउनी करा बहाद्दर जंग भला। उठा उठा तुम्ही झुंजारांनो, पळवुनि लावा शत्रूला॥ ४॥

● ●

## चौक ५ वा

नरसिंहांनो, मारा झडपा कोल्हे शिरले जाळींत। करा गर्जना महाभयंकर नखं सरसावून जोरांत॥ चाल॥ कटावाची चाल॥ कैक वर्षांचा आपला हिमालय। शंकर गौरी तिथें राहती। असंख्य साधू तप आचरिती। गंगा यमुना ब्रह्मपुत्रा या नद्या वाहती पवित्र करती। बद्रीनाथ आणि बद्रीकेदार हीं तीर्थक्षेत्रें तेथें असतीं। पशूपतीश्वर आपलें दैवत। जय शिवशंकर आपली गर्जना। जर्जुनी धावा देश रक्षणा। एकहि पळ नच दवडायाला। चला शत्रुवर तुटून पडा। वीर मराठा रणीं खडा। वीर रजपूत, वीर पंजाबी, आंध्र वीर ही वीर भारती खडाखडा। नौदल, भूदल, हवाईदल हीं

एकवटोनी धडाधडा । चढवा हल्ला मारुनि काढा दुस्मन सारे तडातडा ॥ चाल ॥ जागा झाला, जागा झाला सिंह भारती हा आला। खाऊन टाकिल हा तुम्हांला दुस्मानांनो, मनीं धरा ॥ जी ॥ परतुन जात्रें आपल्या देशा आला तसे रे दुष्टांनो । येथेंच तुमचें मरण नाहींतर, ऐका भेकड नीचांनो ॥ जी ॥ माझा भारत, भारत माझा छंद लागु दे जीवाला । ध्यानीं मनीं स्वप्नीं सदाही ध्यास एक हा हृदयाला ॥ ५ ॥

● ●

## चौक ६ वा

जर चिनी विजयी होईल। तर सर्वस्व लया जाईल ॥ जी ॥ माणुसकी मरून जाईल । संस्कृती खाक होईल ॥ जी ॥ सारीं देवळं नष्ट होतील। सारे देव जळून जातील। धर्माला आग लागेल। नीतिचा जीव जाईल। व्यक्तित्व नष्ट होईल। सारा देश गुलाम होईल। बायकांची अब्रू जाईल। मूलंबाळं ठार होतील। चंगीज-खान पुन्हां येईल। रक्ताचे पाट वाहतील। हातापायांत बेड्या पडतील। पाठीवरती फटके बसतील। जीणं लाजिरवाणं होईल। भारताचा नरक होईल ॥ चाल ॥ चाळीस कोटि भारतीय गुलाम...हें चित्र भयंकर पहा दिसतंय डोळ्याला । ते पहा रक्ताचे पाट चालले खळखळा । ते पहा शत्रूनीं कैक टांगले झाडाला । त्यांनीं पहा कैकांच्या गळा फांस लावला । पोरंबाळं कसे चरचरा चिरती तें पहा । बायकांच्या शीलाला धक्का लागतोय पहा । गोळ्यांनीं पटापट कैक मरती तें पहा । आगीचा डोंब उसळला किती तो पहा । थयथया अंगावर कसे नाचति तें पहा । असं चित्र दिसेल डोळ्याला । म्हणून बंधूंनो, एलगारा करा । छातीचा कोट करून बडवा शत्रूला । असा मारा जोराचा करा कीं कोसळेल भूमिवर सारा । नाहींतर पाठ फिरवुनी जाईल माघारा ॥ ६ ॥

● ●



## चौक ७ वा

पुष्पवृष्टि करण्याला बसले देव फुलें करिं घेऊन। पूर्वज तुमचे आतुरतेनें बघती डोळे लावून ॥ गुरुनानक गुरु गोविंदसिंह हे पाहती पंजाबांतून । बाप्पा रावळ राणा प्रतापसिंह पाहती मेवाडांतून । बुक्कराय हे पाहत असतिल विजयनगरच्या वरतून । छत्रपति श्रीशिवाजी राजे पाहती रायगडावरनं ॥ जी ॥ कैक महात्मे साधुसंतहि टक लावुनि वर बसलेले। लोकमान्य गांधीजी सुभाषहि थोर महात्मे पहाणारे ॥ चला उठा तुम्ही झुंजारांनो, पळही दवडूं नका आतां । विजयश्रीची माळ घेऊनि विजयदेवि येईल आतां ॥ आग आगही होत जिवाची अंगारा पेटुन आला ॥ मर्दांनो, मुजरा करण्याला **पांडुरंग** धांवून आला ॥ जी ॥ ७ ॥

रचना–१९६२.